# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडल, औरंगाबाद.

## प्रकरण क्र. सीजीआरएफ/एझेड/शहर/६६०/२०१७/५३

**(नोदंणी क्रमांक २०१७१२००१७)**

| | |
|---|---|
| तक्रार दाखल | दिनांक :- ०५.१२.२०१७ |
| निकाल | दिनांक :- ०६.०२.२०१८ |

**वापरकर्ता :** श्रीमती गंगासागर मधुकर जाधव तक्रारदार
**वीज ग्राहक :** श्री. विनोद किसनराव उबाळे,
जी.-१/९०, सिडको, एन-७,
औरंगाबाद ४३१००३.
(ग्राहक क्रमांक ४९००११३९६३२९)

## विरुध्द

कार्यकारी अभियंता (प्रशासन), गैरअर्जदार
नोडल ऑफिसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म .
शहर मंडल,
औरंगाबाद.

## मंच

| | |
|---|---|
| १ ) श्रीमती शोभा. बी. वर्मा | अध्यक्ष |
| २ ) श्री. लक्ष्मण मु. काकडे | सदस्य / सचिव |
| ३ ) रिक्त | सदस्य |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच -निर्णय

**१)** अर्जदार / **वापरकर्ता :** श्रीमती गंगासागर मधुकर जाधव, **वीज ग्राहक :** श्री. विनोद किसनरीव उबाळे, जी.-१/९०, सिडको, एन-७, औरंगाबाद हे महावितरणचे ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्रमांक ४९००११३९६३२९ असा आहे. त्यांनी गैरअर्जदार कार्यकारी अभियंता तथा नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे विरुध्द महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ यातील परिशिष्ट -अ नमुन्यात दिनांक ०५.१२.२०१७ रोजी तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीचा थोडक्यात तपशिल खालील प्रमाणे आहे.

**२)** ग्राहकास घरगुती विज पुरवठा हा दिनांक १३.०३.१९९९ रोजी दिलेला आहे. विज बिलावर ग्राहकाचा पत्ता एन-९, ४-१, ९०-१, सिडको, औरंगाबाद असा आहे. तक्रारदार श्रीमती गंगासागर मधुकर जाधव यांनी दिनांक ११.०४.१९९७ रोजी खरेदीखत / करारनामा प्रमाणे घर क्रमांक २१/१/०७, जी-१/०९०/१, त्रिवेणी नगर, सिडको हे श्री. विनोद किसनराव उबाळे यांचेकडुन घेऊन त्या ठिकाणी वास्तव्य करतात असे म्हटले आहे. त्यापृष्ठयर्थ श्रीमती गंगासागर जाधव यांनी जी-९, सिडको, एन-१ असा पत्ता असलेले भारतीय निवडणुक आयोग यांचे ओळखपत्र, तसेच एन-७, जी-१, घ. नं. ९०, त्रिवेणी नगर, सिडको, औरंगाबाद असा पत्ता असलेले आधार ओळखपत्र जोडलेले आहे.

**३)** तक्रारदाराने ऑक्टोबर २०१३ ते एप्रिल २०१६ पर्यंतचे चुकीचे वीज बील रद्द करुन आजपर्यंत वेळोवेळी भरणा केलेली रक्कम त्यामधुन वजा करुन नविन सुधारीत बील देण्याचे आदेश देण्यात यावे अशी मागणी केली. तक्रारदाराने म्हटले आहे की, जून २०१५ पासून प्रत्येक महिन्याला २६६ INACC म्हणुन सरासरीवर आधारीत वीज बील देण्यात आले. तसेच फेब्रुवारी २०१६ मध्ये एकत्रित ५०३५ युनिट टाकुन त्याची विभागणी न करता रुपये ३७,५०७/- चे चुकीचे बील देण्यात आले. तक्रारदाराने दिनांक २४.०८.२०१७ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद येथे तक्रार दाखल केली. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार महावितरणने चुक कबुल करुन त्यांना रुपये ११,५००/- चे बिल देण्यात आले व बील भरणा केल्यानंतर थकबाकी राहणार नाही. येणाऱ्या महिन्यामध्ये वीजबील दुरुसत करुन मिळेल असे सांगितले, त्यामुळे तक्रारदाराने दिनांक ०७.१०.२०१७ रोजी सदर वीजबील भरले. परंतु आज पर्यंत वीज बील दुरुस्त झालेले नाही.

**४)** अतिरिक्त कार्यकारी अभियंता, सिडको उपविभाग, औरंगाबाद यांनी दिनांक १९.१२.२०१७ रोजी म्हणणे मांडले की, विज ग्राहक श्री. विनोद किसनराव उबाळे यांना जानेवारी २०११ ते मे २०१४ दरम्यान मीटरवरील रिडींग प्रमाणे वीज बीले देण्यात आलेली आहेत व सदर ग्राहकास जून २०१४ ते जानेवारी २०१६ पर्यंत २२ महिन्यांची वीज देयके सरासरी (INACC) प्रमाणे देण्यात आली.

**५)** जानेवारी २०१६ मध्ये ५०३५ युनिटचे बील देण्यात आले. परंतु त्याच बरोबर अगोदरच्या वीज बील सरासरीसाठी रुपये ३७,५०७/- चे जमा (Credit) ही देण्यात आले.

**६)** ग्राहकाने दिनांक २१.०१.२०१५ रोजी रुपये १७,६७०/- च्या रकमेचा धनादेश थकबाकी पोटी जमा केला, परंतु सदर धनादेश वटला नाही. त्यामुळे धनादेश रक्कम व दंडाची रक्कम अशी एकुण रुपये १८३५०/- इतकी थकबाकी Debit B-80 दुरुस्ती नंबर ID 1777822 अन्वये वाढविण्यात आली.

**७)** श्रीमती आर. ए. कुलकर्णी, नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांनी दिनांक १६.०१.२०१८ रोजी महावितरणच्या बँक ऑफ महाराष्ट्र येथील खात्याचे दिनांक २१.०१.२०१५ रोजीचे सदर धनादेश परत आल्याचे स्टेटमेंट सादर केले आहे.

**८)** ग्राहकाचा ऑगस्ट २०१६ मध्ये थकबाकी न भरल्यामुळे विद्युत पूरवठा कायमस्वरुपी बंद करण्यात आला. विद्युत पूरवठा कायम स्वरुपी बंद करते वेळी रुपये ७२,४८८ इतकी थकबाकी होती.

**९)** ग्राहकास कायमस्वरुपी थकबाकी ग्राहकासाठीच्या अभय योजना २०१८ मध्ये मुळ थकबाकी रुपये ५४,५३४/-, विलंब रुपये ६८१/- व व्याज रुपये १५४३२/- असे दर्शवुन, ग्राहकाने अभय योजने मध्ये सहभाग घेतल्यास मुळ थकबाकी ५ समान हप्त्यांमध्ये भरावयाची आहे. ग्राहकाने पहिला हप्ता व पुर्नजोडणी शुल्क भरल्यानंतर ग्राहकाचा विद्युत पूरवठा सुरळीत करण्यात आला आहे.

**१०)** गैरअर्जदार यांनी दिनांक ०२.०१.२०१८ रोजीच्या निवेदनामध्ये ग्राहकाने म्हटले होते की, रुपये ११,५००/- भरल्यानंतर त्यांची थकबाकी निरंक होईल असे सांगण्यात आले हे चुकीचे असून दिनांक ०७.१०.२०१७ रोजी ग्राहकास बनवुन देण्यात आलले रुपये ११,५००/- चे विज देयक हे अभय योजने अंतर्गत कायमस्वरुपी विद्युत पूरवठा खंडीत झालेल्या ग्राहकांसाठी पुनर्जोडणीसाठी हप्ता करुन दिला होता व ती प्रथम हप्त्याची रक्कम होती.

**११)** तक्रारदाराने दिनांक ३०.०१.२०१८ रोजीच्या निवेदनामध्ये म्हटले की, त्यांची वीज बिलाची तक्रार प्रथम दिनांक १६.०६.२०१४ रोजी तत्कालीन जीटीएल कंपनीकेडे दिली होती. परंतु अद्यापपावेतो योग्य ती कार्यवाही झालेली नाही. तक्रारदारच्या म्हणण्यानुसार त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट असून कायम स्वरुपी बंद होण्यापुर्वीची थकबाकी कमी करण्यात यावी व ४ समान हप्त्यात

विभागून दिल्यास थकबाकी भरण्यास तयार असल्याचे म्हंटले आहे. वरील प्रमाणे अर्जदार व गैरअर्जदार यांनी सूनावणी दरम्यान सादर केलेले म्हणणे, सादर केलेले दस्तऐवज यांचा विचार करता मंच खालील प्रमाणे निष्कर्ष काढत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | ऑक्टोबर २०१३ ते एप्रिल २०१६ पर्यंतचे वीजबील दुरुस्त करणे आवश्यक आहे का ? | अंशतः होय |
| २) | आदेश ? | सोबत प्रमाणे |

## <u>कारणे</u>

**१२)** **<u>मुद्दा क्रमांक १ :-</u>** ऑक्टोबर २०१३ ते एप्रिल २०१६ पर्यंतचे चुकीचे INACC वीज बील दिले असे ग्राहकाचे म्हणणे आहे. त्या पुष्ठ्यर्थ ग्राहकाने त्यावेळी जीटीएल कंपनीस तक्रारी दिल्या होत्या. त्याच्या पोहच पावत्या **पान क्रमांक ७५** वर दाखल केल्या आहेत. गैरअर्जदार यांनी दाखल केलेली सीपीएलची प्रत **पान क्रमांक १ ते ५५** पाहता असे दिसून येते की, जून २०१४ ते जानेवारी २०१६ पर्यंत ग्राहकास पूर्वीचे युनिट पाहून सरासरी INACC प्रमाणे बील देण्यात आलेले आहे. त्यानंतर फेब्रुवारी २०१६ मध्ये रिडींग प्रमाणे ५०३५ युनिटचे बीलामधुन सरासरी वजावट म्हणुन रुपये ३७,५०७.७२ कमी करण्यात आले व त्यामुळे रक्कम रुपये ३,८७९.०२ फक्त फेब्रुवारी महिन्याचे बील देण्यात आले. सीपीएल पाहता ऑक्टोबर २०१३ ते मे २०१४ व फेब्रुवारी २०१६ ते एप्रिल २०१६ या कालावधी मध्ये मीटर वाचना प्रमाणे देयक दिलेले आहे. या कालावधीमधील सरासरी वापर २६६ युनिट आकारला गेला व पुर्वीचा वीज वापर पाहता मे २०१४ चे २७० युनिट, मार्च २०१६ चे २१६ युनिट पाहता २६६ युनिट हा सरासरी वापर तर्कसंगत आहे व मिळताजुळता वाटतो, त्यामुळे तो बरोबर आहे. त्यामुळे गैरअर्जदार यांनी काढलेले सरासरी वापराचे युनिट हे बरोबर असल्याने आता फक्त ग्राहकाने कधी व किती बिले भरलेली आहेत हे पाहणे आवश्यक आहे.

**१३)** सीपीएल पान क्रमांक ४५ पाहता सप्टेबर २०१३ मध्ये बिलाची रक्कम रुपये १०,६१५.६३ इतकी होती. त्यापैकी ग्राहकाने दिनांक ०७.१०.२०१३ रोजी रक्कम रुपये ५,३००/- चे बील भरले. त्यानंतर ग्राहकाने वीज बिलाची रक्कम भरलेलीच नाही. त्यानंतर २१ जानेवारी २०१५ रोजी चेक क्रमांक ००३३१४ रक्कम रुपये १८,०००/- गैरअर्जदारस लाभार्थ दिला होता. सदरचा चेक गैरअर्जदार यांनी बँक ऑफ महाराष्ट्र, सिडको शाखेत जमा केला असता तो वटला गेला नाही, त्यामुळे तो परत

आला, त्यासंबंधीची बँक ऑफ महाराष्ट्र, सिडको शाखेची गैरअर्जदाराच्या पासबुकातील नोंद दाखविणारी प्रत पान क्रमांक ६७ वर हजर केलेली आहे. त्यामुळे ती रक्कम रुपये १८,०००/- ग्राहकाच्या नावे डेबीट टाकण्यात आली व फेब्रुवारी २०१५ मध्ये रुपये ४०,७८३.४८ म्हणजे वीज बील थकीत रक्कम व चेक न वटल्या गेल्याचे चार्जेस अशी रक्कम बाकी राहीली. एप्रिल १६ पर्यंत ग्राहकाने रक्कम भरली नाही. त्यानंतर एप्रिल २०१६ मध्ये ग्राहकाचा वीज वापर शुन्य (०) दिसत आहे. म्हणजे ग्राहकाचा वीज पूरवठा हा तात्पुरता खंडीत झालेला दिसतो. नंतर ऑगस्ट २०१६ मध्ये वीज बिल न भरल्यामुळे वीज पूरवठा कायमचा खंडित केलेला दिसतो. पान क्रमांक १० वर दिनांक ०७.१०.२०१७ रोजी अभय योजने अंतर्गत मुळ थकबाकी रुपये ५५,२१५/- चे ५ समान हप्त्यांमध्ये थकबाकी भरावी व त्यानंतर व्याज व दंड माफ होऊन मिळणार आहेत आहे असे बिल दिले. ग्राहकाने त्यापैकी १ला हप्ता ऑक्टोबर २०१७ मध्ये रुपये ११,५००/- भरला. त्यामुळे वीज पूरवठा जोडण्यात आला व ऑक्टोबर २०१७ पासून विजेचा वापर सुरु झाला. ग्राहकास त्या प्रमाणे वीज बील देण्यात आले. त्याची प्रत **पान क्रमांक ५७** वर आहे. त्या पुढेही ग्राहकाने अभय योजने अंतर्गत उर्वरित चार हप्त्यांची रक्कम भरली नाही व दिनांक ०५.१२.२०१७ रोजी प्रस्तुतची तक्रार दिली.

१४) वरील प्रमाणे परिस्थिती पाहता व सीपीएल पाहता महावितरण कंपनीने ग्राहकास सरासरी आकारलेले बील वाजवी व बरोबर दिसते. ग्राहकाने असे प्रतिपादन केले की, त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे व त्यास योग्य तो खुलासा न झाल्यामुळे त्यांनी अभय योजनेचे पुढील हप्ते भरलेले नाहीत. परंतु ते कोर्टाचे आदेशाप्रमाणे हप्ते बंदिने रक्कम भरण्यास तयार आहेत.

१५) वरील सर्व परिस्थिती पाहता ग्राहकास व्याजामध्ये सुट देणे आवश्यक आहे. (जी की, अभय योजनेत दिलेलीच आहे). तसेच विलंब आकार पण लावणे योग्य नाही. त्यामुळे **पान क्रमांक ७१** वर जे अभय योजनेत बिल दिलेले आहे, त्यातील रक्कम रुपये ५४,५३४.०५ मधुन ग्राहकाचा पहिला हप्ता रक्कम रुपये ११,५००/- (रिकनेक्शन चार्जेस धरुन) म्हणजे १०,९१०/-वजावट करुन रक्कम रुपये ४३,६२४/- इतकी सप्टेंबर २०१७ पर्यंत येणे बाकी दिसते. या मुद्दल रकमेचे चार समान हप्ते ग्राहकास देणे योग्य व न्याय्य आहे व म्हणुन मुद्दा क्रमांक १ त्याप्रमाणे ग्राहकाचे अंशतः लाभार्थ नोंदण्यात येत असून मुद्दा क्रमांक २ चे उत्तर अर्ज अंशतः मंजूर करुन खालील प्रमाणे आदेश दण्यात येत आहे.

# आदेश

१) सदर ग्राहकाचा तक्रार अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) ग्राहकाचा विद्युत पूरवठा कायमस्वरुपी बंद करतेवेळी मुळ थकबाकी रुपये ५४,५३४/- पैकी त्यांनी भरलेल्या पहिल्या हप्त्याची रक्कम रुपये १०,९१०/- (रिकनेक्शन चार्जस सोडुन) वजावट करुन येणारी रक्कम रुपये ४३,६२४/- ही समान ४ हप्त्यात म्हणजे आज पासून दर महिन्यास १०,९१०/- या हप्त्याप्रमाणे महावितरण कंपनीकडे भरावी

३) ग्राहकास वरील रकमेचा हिशोब करतांना व्याज व विलंब आकार माफ करण्यात आलेले आहे.

४) सदर ग्राहकाने ऑक्टोबर २०१७ पासूनची देयके नियमाप्रमाणे भरावीत.

५) खर्च ज्या त्या पक्षकाराने ज्याचा त्याचा सोसावा.

३) केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या मंचास ३० दिवसात देण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| श्रीमती शोभा बी. वर्मा | लक्ष्मण मु. काकडे | रिक्त |
| अध्यक्ष | सदस्य/सचिव | सदस्य |